# प्रकरण सहावे

# उपसंहार

# प्रकरण सहावे

# उपसंहार

सांगली हे दक्षिण महाराष्ट्रातील महत्वाचे शहर असून ऐतिहासिक, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, राजकीय व व्यापारी केंद्र म्हणून प्रसिध्द आहे. प्राचीन काळापासून सांगलीच्या प्रदेशावर सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट, शिलाहार, यादव बहामनी सुलतान व आदिलशाहीचे राज्य होते. इ. स. १६५९ मध्ये शिवाजी महाराजांचा सेनापती नेताजी पालकरने सांगली, मिरज व ब्रह्मनाळ ही गावे आदिलशाहीकडून जिंकून घेतली व तेथून पुढे खऱ्या अर्थाने मराठ्यांची सत्ता या प्रदेशावर निर्माण झाली. पेशवे काळात इंद्रोजी कदमांकडे मिरज जहागीर होती. त्यांच्या पश्चात पटवर्धनांकडे या भागाची जहागीर आली. मिरज जहागीरीच्या २८ कर्यातीपैकी सांगली ही एक कर्यात होती. (जवळ-जवळ असलेल्या तीन चार गावांना कर्यात म्हणत.) सांगली गावाचा इतिहास म्हणजे तो एक प्रकारे पटवर्धन पराक्रमाचाच इतिहास समजला जातो. कारण मूळच्या ओबड-धोबड असलेल्या सांगली गावाला वैशिष्ट्यपूर्ण बनविले ते पटवर्धनांनीच. सन १८०१ साली मूळ मिरज जहागिरीतून फुटून श्रीमंत चिंतामणराव पटवर्धनांनी (पहिले) आपले वेगळे राज्य स्थापन करुन राजधानीचे ठिकाण म्हणून सांगली गावाची निवड केली. तेंव्हापासून खऱ्या अर्थाने या गावाच्या इतिहासास प्रारंभ झाला.

सन १८०० पूर्वी सांगली गावाची लोकसंख्या अगदीच अल्प होती. तर या गावाला अगदीच नगण्य स्थान होते. या गावाच्या विस्तारासाठी व विकासाच्या दृष्टीने चिंतामणराव आप्पासाहेबांनी (पहिले) सर्व प्रकारच्या व्यापारी पेठा वसवून योजनाबध्द रीतीने सांगलीचा विस्तार घडवून आणला होता. पुढील काळात श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन (दुसरे) यांनी बाहेर गावच्या मोठमोठ्या व्यापाऱ्यांना व सावकारांना सवलती देऊन दुकाने काढावयास परवानगी दिली होती. संस्थानकाळात या व्यापारी पेठांचे भाडे, दंड व जकात श्री गणपती पंचायतन संस्थानास जमा होत असे. उदा. सन १९०१ मध्ये पेठांपासून मिळणाऱ्या

भाड्याचा विचार केला असता त्याची रक्कम १२,४५० पहावयास मिळते. तर पुढील दहा वर्षात म्हणजेच १९११ साली ही रक्कम २२,७६८ रुपयेपर्यंत प्राप्त झाली होती. तर १९२१ साली या रक्कमेचा आकडा ४७,८५० पर्यंत गेला होता. तसेच १९३१ मध्ये भाड्यापासून प्राप्त होणारी रक्कम ५२,९४० रुपये व १९४१ साली ६८,७२० रुपये पर्यंत वाढली होती. सांगली संस्थानात व्यापारी पेठेचा चांगला जम बसल्यावर सन १९३० नध्ये हळदीचा पहिला वायदे बाजार येथे सुरु झाला. त्यामुळे सांगलीच्या व्यापारी पेठेमध्ये लाखो रुपयांची उलाढाल सुरु झालीच पण त्याबरोबर सांगलीचे नाव संपूर्ण भारतात दूरवर पसरले. व्यापाराच्या दळणवळणाच्या दृष्टीने १९०७ मध्ये सांगली मिरज रेल्वे सुरु करण्यात आली होती तर १९२९ रोजी आयर्विन पुलाच्या बांधकामामुळे मुंबई पुण्याला जाण्याचा मार्ग तार झाला होता. त्यामुळे सांगलीचा व्यापार झपाट्याने वाढला होता. .

शहराच्या विकासाबरोबर सांगलीची लोकसंख्या वाढ झपाट्याने झाली होती. त्यामध्ये १९०१ या वर्षाच्या लोकसंख्येची आकडेवारी १६,८२९, सन १९११ ची १६,१४१, सन १९२१ ची २०,३६६, सन १९३१ ची २७,३६६, सन १९४१ ची ३४,७८१, सन १९५१ ची ५०,२८७, सन १९६१ ची ७३,८३८, सन १९७१ ची १,१५,१३८, सन १९८१ ची १,५२,३८९, सन १९९१ ची १,९३,१९७ आणि २००१ ची २,१८,०७९ एवढी आहे. ही लोकसंख्या पाहिली असता सांगली शहराचा विकास जलद गतीने झालेला होता असे दिसून येते.

शैक्षणिक पार्श्वभूमीचा विचार करता श्रीमंत धुडिंराव तात्यासाहेब पटवर्धनांच्या कारकिर्दीत सार्वजनिक शिक्षणात प्रारंभ झाला होता व तेथून पुढील काळात सांगलीमध्ये शिक्षण देणाऱ्या पाठशाळांची संख्या वाढतच गेली होती. मराठी व इंग्रजी पाठशाळांबरोबरच सन १८६५ मध्ये ऋग्वेद, यजुर्वेद, न्याय, व्याकरण व ज्योतिषी शिक्षणाच्या पाठशाळा सुरु झाल्या होत्या. या पाठशाळेत प्रतिवर्षी सुमारे २०० ते २५० विद्यार्थी वेदांच्या निरनिराळ्या अंगाचे शिक्षण घेत होते. सन १९०८ मध्ये कॅप्टन बर्क यांच्या कारकिर्दीमध्ये सांगली

संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्यात आले होते. उच्च शिक्षण संस्थांची निर्मिती पाहत असताना श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन (दुसरे) यांच्या सहकार्याने इ. स. १९१९ मध्ये विलिंग्डन महाविद्यालयाची स्थापना व १९४७ मध्ये वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाची स्थापना झाली होती. उच्च शिक्षणावर श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धनांनी (दुसरे) २ लाख ९९ हजार रु. खर्च केले होते. उच्च शिक्षण संस्थांची निर्मिती करीत असताना स्त्री शिक्षणाकडेही त्यांनी लक्ष पुरविले होते. त्यांच्या प्रयत्नातूनच सांगली शहरामध्ये सन १९३३ ला मुलींच्या स्वतंत्र शिक्षणाच्या सोयीसाठी स्वतंत्र शाळेची स्थापना झाली होती. आज सांगली शहरात अशा स्वतंत्र शाळा व महाविद्यालयांतून हजारो मुली शिक्षण घेतात याचे सर्व श्रेय श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेबांना (दुसरे) व त्यांच्या पत्नी सरस्वतीदेवी पटवर्धन यांनाच जाते. संस्थान काळात सुरु झालेला सांगली शहराचा शैक्षणिक विकास संस्थानाच्या विलिनिकरणानंतर झपाट्याने वाढीस लागला. त्यामध्ये सन १९६१ मध्ये कस्तुरबाई वालचंद महाविद्यालय, सन १९७० मध्ये गणपतराव आरवाडे महाविद्यालय, सन १९८३ मध्ये एन. डी. पाटील रात्र महाविद्यालय व सन १९८५ ला शांतिनिकेतन महाविद्यालय आणि १९८९ मध्ये वसंतदादा दंत महाविद्यालयाची स्थापना झाली होती. शिवाय सन २००५ मध्ये सांगली महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांची संख्या ४२, खाजगी अनुदानित प्राथमिक शाळांची संख्या ३२ व खाजगी विना अनुदानित प्राथमिक शाळांची संख्या १६ आहे. या सर्व एकूण शाळांमधून ४६,६५३ विद्यार्थी शिक्षण घेतात.

सांस्कृतिक दृष्टीकोनातून पाहिले असता सांगली शहर हे मराठी रंगभूमीचे जन्मस्थान व ' नाट्यपंढरी ' म्हणून ओळखले जाते. त्याबरोबरच संगीत लोककला साहित्य इत्यादी क्षेत्रातही सांगली शहराचा लौकिक आहे.

श्रीमंत धुंडिराव तात्यासाहेब पटवर्धन यांच्या कारकिर्दीत राजकीय वातावरण निर्मिती झाली होती. तर कॅप्टन बर्क यांनी सन १९०८ मध्ये रयत सभेची स्थापना करुन प्रजेच्या तंत्राने राज्यकारभार चालविण्याचे बीजारोपण केले होते. सन १९०५ मध्ये नामदार गोपाळकृष्ण

गोखलेंच्या भारत सेवक समाजाची स्थापना झाली होती. त्यांच्या पहिल्या सभासदांमध्ये सांगलीचे श्री. वामनरावजी पटवर्धन आजीव सदस्य झाले होते. सन १९२० मध्ये ज्योतिष संमेलनाच्या निमित्ताने लोकमान्य टिळकांनी सांगलीस भेट दिली होती. त्यांच्या या भेटीचा परिणाम सांगलीच्या जनतेवर एवढा झाला की १९२४ रोजी ' लोकमान्य टिळक स्मारक ' ही राजकीय जागृतीचे काम करणारी संस्था सांगलीत निर्माण झाली. इ.स. १९२२ ते १९४० या काळात सांगली संस्थानात सांगली दक्षिणी संस्थान प्रजा परिषदेची पंधरा अधिवेशने झाली. तर सन १९४६ मध्ये श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धनांनी (दुसरे) संस्थानात जबाबदार राज्य पध्दतीची स्थापना केली. संस्थानाच्या विलिनिकरणानंतर सांगलीच्या राजकीय पटलावर मा. पद्मभूषण वसंतदादा पाटील हे आघाडीचे नेते होते. ते काँग्रेस पक्षाचे असल्याने त्या पक्षावर त्यांची निष्ठा होती. देशाला स्वातंत्र्याची प्राप्ती झाल्यानंतर १९४९ मध्ये सातारा जिल्ह्याचे विभाजन उत्तर सातारा व दक्षिण सातारा या दोन जिल्ह्यात झाले होते. त्यातील दक्षिण साताऱ्याचे मुख्य ठिकाण सांगली झाले व सांगली जिल्हा दादांचे कार्यक्षेत्र बनला. सन १९५२ मध्ये झालेल्या निवडणुकीत ते सांगली मतदार संघातून निवडून आले. तर १९७८ मध्ये त्यांनी पाटबंधारे पदाचा कार्यभार पाहिला. इ.स. १९७६ ते १९८५ या कालावधीत ते एकूण चार वेळा मुख्यमंत्री झाले. त्यांच्या कारकिर्दीत राजकीय, शैक्षणिक, सहकार, व्यापार व कृषी यामध्ये महत्वाचा व चिरकाल टिकणाऱ्या सुधारणा झाल्या होत्या.

सांगलीला धार्मिक महत्त्व प्राप्त होण्यास श्री गणपती पंचायतन संस्थान मंदिराची स्थापना हा महत्त्वाचा घटक कारणीभूत ठरला होता. पंचायतन म्हणजे शिव, सूर्य, चिंतामणेश्वरी, लक्ष्मी-नारायण व गणपती या एकत्रित देवतांचा समूह. हिंदू धर्मात या पाच देवतांची पूजा प्रामुख्याने रुढ आणि लोकप्रिय झाली. त्यात गणपती या देवतेचे स्थान अनन्य साधारण आहे. कारण ही देवता म्हणजे सुखकारक व दुःखहारक असून जीवनातील यशाचे मूर्त प्रतिक आहे.

श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धनांनी (पहिले) आराध्य दैवत गणपतीच्या अलोट श्रध्देतूनच या मंदिराची उभारणी केली होती. मंदिराच्या बांधकामास प्रारंभ केल्यावर

त्यांनी मंदिर परिसरात बांधकामासाठी निरनिराळे विभाग सुरु केले होते. या विभागात कार्यरत असणाऱ्या मजुरांच्या नावाची यादी पाहिल्यावर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते आणि ती म्हणजे श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेबांनी (पहिले) या वास्तूच्या बांधकामात सर्व जातीधर्माच्या लोकांना समाविष्ट करुन घेतले होते व त्यातूनच भव्य व पवित्र मंदिराची उभारणी झाली होती. या बांधकामात दिशासाधन तंत्राचा वापर करण्याची असामान्य हातोटी वापरली असल्याने गाभाऱ्यातील मुर्त्यांचे दर्शन महाद्वारापासून अथवा रस्त्यावरुनही होते. शिवाय वर्षाच्या ठराविक दिवशी उगवत्या सूर्याची किरणे अचूकपणे मुर्तीवर पडतात. हे बांधकामाचे वैशिष्ट्ये नमुद करण्यासारखे आहे. या बांधकामासाठी लागणारा काळा पाषाण जोतिबाच्या डोंगरातून आणला होता. सन १८१४ मध्ये वाहतुकीची साधने उपलब्ध नसल्याने हा पाषाण वडारी गाडयांमधून सांगलीपर्यंत आणला होता. भव्यता, स्थैर्य, प्रमाणबध्दता, सौंदर्य व बळकटी ही मंदिराची वैशिष्ट्ये असून या मंदिराचा प्रत्येक पाषाण आरशासारखा गुळगुळीत व घोटीव बनविण्याची कला या मजुरांनी वापरलेली दिसते. त्यामुळे या मंदिराच्या उभारणीस दीडशे वर्षाचा कालावधी लोटला असला तरी त्याची उभारणी अलिकडील काळात झाल्यासारखी भासते. पाच देवतांच्या मंदिरांची एकत्रित बांधणी असल्यामुळे या मंदिरास पंचायतन असे संबोधले जाते अशा प्रकारची मंदिरे क्वचितच आढळत असल्याने आज सांगलीचे वैशिष्ट्य म्हणून या मंदिराकडे पाहिले जाते. श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धनांचे (पहिले) या मंदिरास महत्वाचे योगदान लाभले होते.

मंदिराच्या गाभाऱ्यातील शिल्पांचा अभ्यास केला असता असे दिसून आले की ही शिल्पे संगमरवरी पाषाणापासून घडविली असून पिढ्यान्‌पिढ्या पाषाणास दिव्यत्व प्राप्त करुन देणाऱ्या त्या शिल्पकारांच्या परिश्रमाची व चिकाटीची कल्पना येते. आध्यात्मिकता हे भारतीय शिल्पकलेचे वैशिष्ट्य असून मानवी मनाची प्रचलित धर्मभावना मूर्त रुपात व्यक्त करणे हाच शिल्पकलेचा मूळ उद्देश दिसून येतो. या शिल्पांच्या निर्मितीसाठी मुकुंदा पाथरवट व जिवाण्णा देशिंगकर या मजुरांची नियुक्ती केली होती. श्री गणपतीचे शिल्प बनविण्यासाठी १४ रु. १२ आणे मजुरी खर्च आला होता.

प्रारंभीपासूनच मंदिराचा परिसर शांत व हिरव्यागार वनराईने नटलेला आहे. परंतु सन २००१ सालापासून सध्याचे मंदिराचे विश्वस्त व व्यवस्थापकांनी मंदिराच्या जीर्णोध्दाराबरोबर मंदिर परिसराचे सुशोभिकरण घडवून आणले आहे. त्यासाठी मंदिराच्या दुतर्फा विविध फुलझाडे, फळझाडे व शोभेच्या झाडांची लागवड करुन हिरवीगार वनराई निर्माण केली आहे. त्यामुळे स्वच्छता व पावित्र्याच्या जोडीला सौंदर्याचा मिलाफ साधलेला दिसतो. अशा शांत, प्रसन्न व विविध वनराईने नटलेल्या मंदिराचे महत्व मानसिक परिणामांच्या दृष्टीने विशेष असते. कारण दैनंदिन जीवनाच्या धकाधकीत मानवी मनाची विलक्षण ओढाताण होत असल्याने अशा प्रसन्न वातावरणात भाविकाच्या मनातील सुप्त सात्विकतेला जाग येऊन त्यास आत्मनिरीक्षण करण्याची संधी प्राप्त होते. शिवाय या मंदिराच्या प्राकारात पूजेसाठी व नैवेद्यासाठी लागणाऱ्या वस्तुंची नीटनेटकी, नेमस्त व ठराविक भावात व्यवहार करणारी मोजकीच दुकाने असल्याने या मंदिराच्या पावित्र्याचे गांभीर्य टिकून राहिल्याचे दिसते.

मंदिराच्या सर्वांगीण विकासासाठी उत्पन्नाच्या महत्वाचा आर्थिक स्त्रोत सांगली व सांगलीवाडी या गावच्या इनाम जमिनींचा महसूल होता. ही गावे चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धनांनी (पहिले) सन १८१८ रोजी श्री गणपती पंचायतन मंदिरास इनाम दिली होती. याशिवाय संस्थानाच्या सहा तालुक्याच्याही जमिनी इनाम होत्या. या जमिनीपासून सन १८१८ रोजी १८,१२५ रुपये महसूल प्राप्त झाला होता. त्याचबरोबर पागाखाते, बागमळा, भाडे, व्याज, देणगी, निधी व किरकोळ मार्गानीही उत्पन्नाची प्राप्ती होत असे. या उत्पन्नाचा विनियोग मंदिराच्या वार्षिक दुरुस्त्या, धार्मिक विधी, सुरक्षा व्यवस्था व कामगारांचे पगार या सर्व बाबींवर केला जातो. याचे संदर्भ मंदिराच्या जमाखर्चाच्या अंदाजपत्रकावरुन दिसून येतात. सन २००१ पासून कार्यरत असणारे मंदिराचे व्यवस्थापक श्री. बी. के. जाजू यांनी मंदिराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी जमा व खर्चाचा समन्वय साधून मंदिराची सर्वांगीण प्रगती घडवून आणली आहे. मंदिराचे विश्वस्त या नात्याने श्रीमंत विजयसिंह राजेसाहेबांनी

ज्या कल्पना मंदिर परिसराच्या सुधारणेसाठी राबविल्या त्या कार्य स्वरुपात आणण्यासाठी मंदिराच्या प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी वर्गाचा फार मोठा सहभाग त्यांना लाभला आहे.

पंचायतन मंदिराच्या संस्थान काळातील नित्याचे व नैमित्तिक धार्मिक विधी व सध्याचे धार्मिक विधी यांचा आढावा घेतला असता एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते आणि ती म्हणजे मंदिराच्या स्थापनेपासून ते आतापर्यंत मंदिराचे सर्व धार्मिक विधी पूर्व परंपरेने सुरु आहेत त्यात कोणताही बदल आढळून येत नाही. या मंरितील गणेशोत्सवास संस्थान काळापासूनच वैशिष्ट्यपूर्णता लाभली असून पूर्व परंपरेने आजही हा उत्सव साजरा होतो.

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात गणेश पूजनाला असीम महत्व आहे. लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाच्या माध्यमातून जनजागृती, लोकजागृती निर्माण करावयाचा अभिनव प्रयत्न केला होता. मुख्यत: महाराष्ट्राबाहेर संपूर्ण राष्ट्रांमध्ये इतरत्र गणेशोत्सवाची लोकप्रियता आणि व्याप्ती झपाट्याने वाढीस लागली आहे. महाराष्ट्रात अष्टविनायक हे पवित्र स्थान आहे. तर पुण्यातील दगडूशेठ हलवाई या गणपतीने वेगळे स्थान निर्माण केले आहे. महाराष्ट्रातील या प्रसिध्द गणपती मंदिरांच्या मध्ये सांगलीतील श्री गणपती पंचायतन या मंदिराचा अंतर्भाव केला जातो. दीडशे वर्षापूर्वी बांधण्यात आलेले हे मंदिर धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक महत्व असलेले आणि भक्तजनांचे प्रमुख आकर्षण आहे. या मंदिराचे महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे उपासना होत असलेल्या गणपतीची मुर्ती दोन फूटी आहे. तर गणपती उत्सवात वापरल्या जाणाऱ्या कागदाच्या लगद्यापासून तयार केलेल्या मुर्त्या दीडशे वर्षापासून पूर्वपरंपरेने वापरल्या जातात. या मुर्त्यांचे विसर्जन केले जात नाही. त्यामुळे निर्माण होणारे जलप्रदुषण व वायुप्रदुषणापासून हे स्थान मुक्त आहे. शिवाय इथे फक्त गणपतीचीच उपासना होत नसून या मंदिराद्वारे मोफत अन्नछत्र, अनाथांसाठी विशेष सवलती, मोफत वैद्यकीय सेवा केंद्र तसेच उर्दू व जर्मन भाषेचे वर्ग इत्यादी उपक्रम राबविले जातात. सवधर्मसमभावाचा ऐतिहासिक वारसा जपला जात आहे. त्यामुळे मंदिरात येणाऱ्या भाविकांची संख्या अफाटपणे वाढत

आहे. समस्त सांगलीतील जनतेचे आराध्य दैवत गणपती असून हे मंदिर म्हणजे सांगलीचे वैशिष्ट्य मानले जाते. गणेशोत्सवाच्या पूर्वपरंपरेचे जतन करीत त्या वैभवात भर घालण्याच्या दृष्टीने श्रीमंत विजयसिंहराजे पटवर्धनांनी सन २००७ सालापासून रथोत्सवाची संकल्पना पुढे आणली. त्यामुळे २००७ सालाच्या विसर्जन मिरवणुकीचे खास वैशिष्ट्य म्हणजे हा ' विजयरथ ' होय.

याशिवाय लोकमान्य टिळकांनी राष्ट्र जागृतीसाठी सुरु केलेल्या उत्सवाचे लोण सांगलीत पोहचण्यास दोन घटक कारणीभूत झाले होते. ते म्हणजे सांगलीचे आराध्य दैवत गणपती होते व त्यावेळेसही सांगली शहर राजकीयदृष्ट्या पुढारलेले होते. त्यामुळे सांगलीचा पहिला सार्वजनिक गणेशोत्सव सन १९३० रोजी साजरा झाला. पण तत्पूर्वी सांगली संस्थानाचे राजवैद्य आबासाहेब सांभारेनी टिळकांच्या प्रेरणेने सन १८९९ रोजी आपल्या राहत्या वाड्यात उत्सवास प्रारंभ केला होता. त्यांनी उत्सवासाठी तयार करुन घेतलेली मूर्ती त्या काळात संपूर्ण महाराष्ट्रात एकमेव अशी होती. स्वातंत्र्यपूर्व काळात या उत्सवांच्या माध्यमातून सांगलीत समाज जागृतीसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जात होते. त्यामध्ये उत्सवाची लोकप्रियता वाढविण्यासाठी मेळा हे साधन सांगलीत प्रभावी ठरले होते. किंबहुना सांगली म्हणजे मेळ्यांचे माहेरघरच मानले जाई. त्यामुळे हा गणेशोत्सव राष्ट्रीय जागृतीसाठी, स्वातंत्र्य आंदोलनासाठी, सामाजिक ऐक्य प्रस्थापित करण्यासाठी व लोकसंघटनातून विचारांच्या देवाणघेवाणीसाठी होता. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात मात्र या उत्सवाचे स्वरूप झपाट्याने बदलले त्यामध्ये उत्सव करणाऱ्या मंडळांची संख्या तर अमर्याद वाढलीच परंतु पारंपारिकतेने सुरु असलेल्या कार्यक्रमांचे स्वरूपह बदलले. शिवाय जलप्रदुषण, ध्वनिप्रदुषण व हवेच्या प्रदुषणामुळे निसर्गाचा समतोलही बिघडला जात आहे. परंतु या समस्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी सांगलीतील काही पर्यावरणप्रेमी संस्था व गणेशोत्सव मंडळे प्रयत्नशील असलेली दिसून येतात. त्यांचे हे विधायक उपक्रम स्पृहणीय असेच आहेत. गणेशोत्सव हा धार्मिक व सामाजिक अशा स्वररुपाचा असल्याने या उत्सवाचे पावित्र्य व गांभीर्य राखणे हे प्रत्येकाचे

कर्तव्य आहे. या उत्सवाच्या माध्यमातून शहरातील वैषम्य नाहीसे करण्याचा प्रयत्न तरुण पिढीने केल्यास भावी काळातील गणेशोत्सव नक्कीच सुखकर होईल.

# संदर्भ ग्रंथ सूची

# संदर्भ ग्रंथ सूची

## प्राथमिक साधने :

### प्रकाशित ग्रंथ :


१) अग्रवाल गु. रा., मिरज संस्थानाचा परिचय, मिरज, १९४२.

२) कुंटे गो. ज. सांगली संस्थानचे संस्थापक थोरले चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन यांचे चरित्र, सांगली, १९७१.

३) केळकर य. न., ना. के. जोशी (संपा.) श्रीमंत पहिले चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन यांची दिनचर्या, पुणे, १९६७, खंड - १,२.

४) चांदोरकर, गो. का. पेशवाईची अखेर (१८१८), धुळे, १८४०.

५) चौधरी कि. का., महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, कोल्हापूर, जिल्हा, दार्शनिक विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८९.

६) जोशी प्र.न., शिवपुराण, पुणे, १९८२.

७) दप्तरदार, भ. अ., हिज हायनेस श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन राजेसाहेब, सांगली, १९६०.

८) पटवर्धन वि. अ., दक्षिण महाराष्ट्रातील संस्थानाच्या विलिनिकरणाची कथा, पुणे, १९६६.

९) पटवर्धन वि. ग., चित्तपावन कौंडिण्यगोत्री पटवर्धन कुल वृत्तांत, सांगली, १९४०.

१०) पारसनीस, डी. बी., द सांगली स्टेट, सातारा, १९१७.

११) पालकर, ना.ह., मंदिराची कथा आणि व्यथा, पुणे, १९६३.

१२) बर्क आर. सी. नोटस् ऑन दि सांगली स्टेट, सांगली, १९०९.

१३) महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, सांगली जिल्हा, डायरेक्टरेट ऑफ गर्व्हमेट प्रिटिंग स्टेशनरी, मुंबई, १९६९.

१४) लिमये पी. एम., सांगली स्टेट (१९१० ते १९४८) मोनोग्राफ ऑन द रुल ऑफ कॅप्टन सर चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन, सांगली, १९५५.

१५) शिंदे एम. के., नाट्यशास्त्र आणि तंत्र, मुंबई, १९५२.

## अप्रकाशित प्राथमिक साधने :

१) श्री गणपती पंचायतन संस्थान कार्यालयातील मोडी लिपीतील दप्तर.

२) सांगली, मिरज, कुपवाड महानगरपालिका कार्यालयातील दप्तर.

३) सांगली धर्मादाय आयुक्त कार्यालयातील दप्तर.

४) सांगली पोलीस मुख्यालयातील दप्तर.

## दुय्यम संदर्भ साधने :

## प्रकाशित ग्रंथ :

१) अभ्यंकर श.वा., (संपा.) भारतीय उपासना, आदित्य प्रतिष्ठान, आवृत्ती- १ ली, पुणे २००१.

२) अभ्यंकर श. वा., श्री गणपती अथर्वशीर्ष, आदित्य प्रतिष्ठान, पुणे, २०००.

३) आठवले ज. बा., आठवले कुं. ज., अध्यात्मशास्त्र, सनातन भारतीय संस्कृती संस्था, खंड ९ ई, मुंबई, १९९७.

४) ओक प्रमोद, पेशवे घराण्याचा इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २००१.

५) करंदीकर ज.स., श्री गणेशोत्सवाची साठ वर्ष, सार्वजनिक गणेशोत्सव हीरक महोत्सवी मंडळ, पुणे, १९५३.

६) कुलकर्णी अ. रा., प्राचीन भारतीय संस्कृती आणि इतिहास, आवृत्ती - १ ली, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, सोलापूर, १९६२.

७) कोलारकर श. गो., मराठ्यांचा इतिहास, आवृत्ती-५ वी, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, २००३.

८) खाडिलकर का.ह., शहर सांगली, सांगली नगरपालिका, सांगली, १९३९.

९) खोले, ग. श., भारतीय तीर्थक्षेत्रे, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे, १९८५.

१०) गाडगीळ अ. ल., श्री गणेशकोश, आवृत्ती- १ ली, बोरा अॅन्ड कंपनी प्रा. लि. प्रकाशन, पुणे, १९६८.

११) जोशी नि. पु., भारतीय मुर्तीशास्त्र, नियंत्रक प्रकाशन समिती, पुणे, १९७९.

१२) जोशी म. य., श्री गणेश आणि गणेश उपासना, प्रसाद प्रकाशन, पुणे, १९७३.

१३) जोशी प्र. न., मुदगलपुराण, प्रसाद प्रकाशन, पुणे, १८९२.

१४) टिळक अविनाश, सांगली आणि सांगलीकर, सांगली नगरपालिका, सांगली, २००५.

१५) दांडेकर गो. नी., श्री गणेश पुराण, मॅजेस्टिक बुक स्टॉल, आवृत्ती- २ री, मुंबई, १९७९.

१६) देसाई सी. ग., श्री गजानन दर्शन, मंजिरी प्रकाशन, पुणे, १९७६.

१७) पठाण के. जी., मंग्नाळे व्ही.एस., (संपा.) इंटेलेकय्युमत्स संदर्भ महाराष्ट्र राज्य व जिल्हे एक दृष्टीकोण, खंड - ५ वा, इंटेलेक्युअल बुक ब्युरो, भोपाळ, २००५.

१८) पटवर्धन वि.ग., परमपूज्य ब्रह्मीभूत हरिभटजीबाबा पटवर्धन यांचे चरित्र, आवृत्ती- २ री, गणपती संस्थान प्रेस, सांगली, १९६२.

१९) पाटील रा. तु., सांगली सातान्याचे राजकारण, आवृत्ती-१ ली, परखड प्रकाशन, कराड, १९८६.

२०) पाटील रा. तु., वसंतदादा पाटील एक दिलदार नेता व राजा माणूस, परखड प्रकाशन, तडसर, १९९०.

२१) फाटक ज. वि., गणपतीपुळे महात्म्य वर्णन, आवृत्ती - ४ थी, रत्नागिरी, १९०९.

२२) फाटक न. र., लोकमान्य, मौज प्रकाशन, आवृत्ती - १ ली, मुंबई, १९७२.

२३) बाबर सरोजिनी, श्रावण- भाद्रपद, महाराष्ट्र राज्य लोक साहित्य समिती, आवृत्ती- १ ली, पुणे, १९८५.


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

२४) बापट त्र्यं. ग., माळी ग. द., थोरांचा परिचय, निळकंठ प्रकाशन, पुणे, १९५५.

२५) भावे वा. कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र, वर्धा प्रकाशन, आवृत्ती - १ ली, पुणे, १९३५.

२६) मार्डीकर मदन, प्राचीन भारताचा इतिहास, आवृत्ती - १ ली, औरंगाबाद, १९७७.

२७) मिराशी वा. वि., शिलाहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख, विदर्भ संशोन मंडळ, नागपूर, १९७४.

२८) मुजावर ए. आय., (संपा.) सांगली जिल्हा गाईड डिरेक्टरी, सांगली, १९८७.

२९) ऋग्वेदी, आर्यांच्या सणांचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास, व्ही. प्रभा आणि कंपनी, मुंबई, १९१६.

३०) वर्णेकर श्री. भा., भारतीय धर्म व तत्वज्ञान, आवृत्ती - १ ली, लेखन वाचन भांडार, पुणे, १९७५.

३१) शेवडे सच्चिदानंद, बाप्पा मोरया, अंजी पब्लिशिंग हाऊस, आवृत्ती- १ली, पुणे, २००४.

३२) शेवडे प. मा., श्री गणेश अध्यात्मदर्शन, मनोरमा प्रकाशन, मुंबई, २००४.

३३) सरदार गं. बा., (संपा.) महाराष्ट्र जीवन, परंपरा, प्रगती आणि समस्या, खंड-१ ला, लोखंडे प्रकाशन, पुणे, १९६०.

३४) सहस्त्रबुध्दे चिंतामणी, सांगलीच्या पाऊलखुणा, सकाळ पेपर्स लि. प्रकाशन, कोल्हापूर, २००५.

३५) सार्वजनिक गणेशोत्सव शतकाची वाटचाल स्मरणिका समिती, श्री सार्वजनिक गणेशोत्सव संस्थान, आवृत्ती - १ ली, मुंबई, १९९२.

३६) सावंत बी. बी., साळुंखे टी. डी., ऐतिहासिक कागदपत्रे व स्थळे, मेहता पब्लिकेशिंग हाऊस, पुणे, १९९२.

३७) स्वरुपानंद सरस्वती, श्री गणपती अथर्वशीर्षम, भीमाशंकर ट्रस्ट, आवृत्ती- १ली, फुलगाव, १९९१.

## कोश :

१) कामत श्री. पा., (संपा.) मराठी विश्वचरित्र कोश, विश्वचरित्र संशोधन केंद्र, खंड-१ला, गोवा, २०००.

२) कुलकर्णी कृ. पा. मराठी व्युत्पत्ती कोश, लेखन वाचन भांडार, आवृत्ती २ री, पुणे, १९६४.

३) चित्राव सिध्देश्वरशास्त्री, भारतवर्षीय मध्ययुगीन चरित्रकोश, भारतीय चरित्रकोश कंपनी, पुणे, १९३७.

४) चित्राव सिध्देश्वरशास्त्री, भारतवर्षीय प्राचीन चरित्रकोश, भारतीय चरित्रकोश कंपनी, खंड- १ ला, पुणे, १९६८.

५) जोशी महादेवशास्त्री (संपा.) भारतीय संस्कृतीकोश, वैज्ञानिक संशोधन व सांस्कृतिक व्यवहार मंडळ, नवी दिल्ली, १९६५, खंड क्र. २,३,१३.

६) जोशी महादेवशास्त्री (संपा.) मराठी विश्वकोश, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९७६, खंड क्र. ४,९,१२.

७) जोशी प्र. न., आदर्श मराठी शब्दकोश, विदर्भ मराठवाडा बुक कंपनी, पुणे, १९६९.

८) ठकार वि. ग., पर्यायी शब्दकोश, मेहता प्रकाशन, आवृत्ती- २री, पुणे, २००१.

९) दाते य. रा., (संपा.) महाराष्ट्र शब्दकोश, पुणे, १९३८, खंड - ४,५,७.

१०) भिडे आणि वाळिंबे, सरस्वती शब्दकोश, प्रिटिंग प्रेस, पुणे, १९६९.

## प्रश्नावली :

श्री गणपती पंचायतन संस्थान मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांकडून भरुन घेतलेल्या २५० प्रश्नावलींचा आधार घेतला आहे.

## मुलाखती :

१) श्री. बी. के. जाजू.

२) श्री. रमेश पाटणकर

३) श्री. डॉ. रविंद्र व्होरा

४) श्री. विजय बक्षी

**स्मरणिका/विशेषांक/मासिके :**

१) सांगली नगरपरिषद शताब्दी महोत्सव स्मरणिका.

२) सुवर्णमहोत्सवी श्री गजानन सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्मरणिका, २००५.

३) सावकार सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, स्मरणिका, २००५.

४) मा. पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील अमृत महोत्सवी जयंती समारोह, सहकार विशेषांक, १९९२.

५) ओम गणेश सार्वजनिक गणपती संस्था वार्षिक अहवाल, २०००.

६) श्री गणपती पंचायतन संस्थान सांगली, श्री गणेश दर्शन विशेषांक, २००४.

७) तरुण भारत गणेश दैवत विशेषांक, १९८६.

८) कापडिया भरत., (संपा.) चित्रलेखा गणेशोत्सव विशेषांक, मुंबई, २००४.

९) पंचिद्रे श्री. ग., (उप संपा,) दै. पुढारी विशेषांक, कोल्हापूर, २००१.

१०) वर्मा प्रदिप., (संपा.) साप्ताहिक लोकप्रभा, गणेश विशेषांक, ९ सप्टें. २००५.

११) डुम्बरे सदा., (संपा.) साप्ताहिक सकाळ गणेश विशेषांक, पुणे, २००७.

१२) भारद्वाज, (संपा.) अभिनव साहित्यमाला, पत्रक ३६ वे.

१३) अप्रबुध्द, पुरुषार्थ, गणपती विशेषांक, वर्ष १३ वे, अंक - २ रा, १९३६.

१४) देशपांडे प्र. न., (संपा.) संशोधक नियतकालिक, वर्ष ७१वे, अंक - ४ था, २००३.

१५) सत्यनारायण नीता, जैन सुनिती (संपा.) लोकराज्य, मुंबई, सप्टें. २०००.

**वृत्तपत्रे :**

**दैनिक पुढारी :** ८ सप्टेंबर २००६, १६ सप्टेंबर २००७, २८ सप्टेंबर २००७.

**दैनिक सकाळ :** १६ सप्टेंबर १९९६, ४ सप्टेंबर २०००, १६ सप्टेंबर २००७.

**दैनिक तरुण भारत :** ४ ऑक्टोबर १९८६, २६ आक्टोबर २००७.

**दैनिक लोकमत :** १७ सप्टेंबर २००४, २६ आक्टोबर २००७.

**दैनिक लोकसत्ता :** १ सप्टेंबर २००६.

**दैनिक केसरी :** २ सप्टेंबर १९९०, १४ सप्टेंबर १९९९, २६ आक्टोबर २००७.

# परिशिष्टये

# श्री गणपती पंचायतन मंदिर, सांगली



# सांगली संस्थानचे संस्थापक



## पहिले चिंतामणराव आपासाहेब पटवर्धन

न : ५ जानेवारी १७७५ महानिर्वाण : १५ जुलै १८५



कॅप्टन् हिज हायनेस राजा श्रीमंत सर चिंतामणराव आप्पासाहेब,
K.C.S.I., K.C.I.E., राजा ऑफ् सांगली



हिज हायनेस श्रीमंत विजयसिंहराजे पटवर्धन


## सन २००४ मधील कृष्णा नदीच्या पात्रातील अर्धवट अवस्थेतील विसर्जित झालेल्या गणेश मूर्त्या






BARR. BALASAHEB KHA DEK R LIBRARY
SHIVAJI UNIVER Y, K LHAPUR.

# सांगलीचे नांव " सागली " होते त्याचा हा पुरावा




" सरकार श्रीगणपतीमहाराज पंचायतन संस्थान कसबे सागली ( " सा " वर अनुस्वार नाही )
पदमाण्णा बीन वीरगोंडा पाटील कसबे सागली
सन १२६७ फसली. मुताबिक सन १८५७/५८ शके १७७९ "
अशा मजूकराचे गावकामगार पाटलांच्या जमाखर्चाच्या वहीचे पान. सदर पानावर श्री गणपती संस्थानची मोहर आहे.

# सांगली शहरका मानचित्र (नियोजित विस्तार के साथ)




ााााााा अशा रेघेपलिकडील भाग नियोजित विस्ताराचा.


एस.बी.लिथो प्रेस, सांगली.



HORSE
STORE & LABOUR
TEMPLE
(59.00) SQ MT
SHRI GANPATI TEMPLE
HALL
448.00 SQMT
DRINKING FOUNTAIN
ADMINISTRATIVE BLOCK & SUHITI BHAVAN (594.00 SQMT)
LAWN
KITCHEN (150.00 SQMT)
QUARTERS (354.00 SQMT)
PATHSHALA
LANDSCAPE
GARDEN FOUNTAIN
SHOP 49.00
SHOE STAND
(222.00 SQMT)
(222.00 SQ MT)
ENTRANCE
BANK (1320.00 SQMT)
GATE
TEMPLE
QUARTERS (816.00 SQMT)
MAIN ROAD MAIN ROAD
PANCHAYTAN SANSTHAN, SANGLI SCHEMATIC LAYOUT
ARCHITECT

# वाहतुक नियंत्रण शाखा, सांगली

## गणपती विसर्जन मिरवणुक मार्ग
## पर्यायी वाहतुक मार्ग व पार्कींग व्यवस्था




सुची :
१) गणपती विसर्जन मिरवणुक मार्ग
२) पार्कींग ठिकाणे
३) पर्यायी वाहतुक मार्ग
४) प्रवेश बंद ठिकाणे (बॅरेकेटींग)